राज्यातील सर्व शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाईन पध्दतीने करण्यासाठी विभागाने सुरु केलेल्या शालार्थ प्रणालीचे कामकाज पाहण्यासाठी महाआयटी महामंडळाच्या संगणक तंज्ञाची नियुक्ती करणे बाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः ई गव्ह.-१५१७/प्र.क्र.२६/संगणक

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक:- ०९ नोव्हेबर, २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२४१२/(८१-अ/१२)/अर्थसंकल्प, दि. ७ नोव्हेबर, २०१२
२) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२४१२/(८१-अ/१२)/अर्थसंकल्प, दि.२९ डिसेबर, २०१२

प्रस्तावना :-

ई- गव्हर्नन्स योजनेअंतर्गत विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या खाजगी अनुदानित तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या, माध्यमिक व उच्च माध्यमिक,शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालये अध्यापक विद्यालये व सैनिकी शाळांतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वेतन देयके ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यासाठी सन २०१२ पासून शालार्थ प्रणाली सुरु करण्यात आली असून शालार्थ प्रणालीची राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेस लि.(TCS LTD.) ची नियुक्ती करण्यात आली आहे. शालार्थ प्रणाली पुरेशी विकसित करुन कामकाजात वेळोवेळी उदभवणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी TCS कंपनीला आतापर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. TCS कंपनीच्या संगणक तंज्ञाकडून शालार्थ प्रणालीचे ज्ञान हस्तांतर करण्यासाठी (Knowledge Transfer) महाआयटीकडे सोपविण्यासाठी सगणक तंज्ञाची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

शालार्थ संगणक प्रणालीचे कामकाज पाहण्यासाठी महाआयटी महामंडळाच्या ४ (चार) संगणक तंज्ञाच्या सेवा ५ महिन्यांसाठी घेण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर संगणक तंज्ञाच्या सेवांपोटी महाआयटीला देय रकमेचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

Sr. No.	Manpower Description	No.of Persons	Required Period (In Months/Days)	Rate Per Months (Exclusive of Service Tax) (Rs.)	Total Amount (in Rs.)
		(A)	**(B)**	**(C)**	**(D)**
1	Senior Software Developer (Exp. 4 Years)	1	5 Months From date of joining	1,07,800.00	5,39,000.00
2	Software Developer (Exp. 2 Years)	1	5 Months From date of joining	53,900.00	2,69,500.00

3	Software Tester (Exp. 3 Years)	1	5 Months From date of joining	42,900.00	2,14,500.00
4	Database Administrator (Exp. 4 Years)	1	5 Months From date of joining	71,500.00	3,57,500.00
	1) Total Amount (Rs.)				13,80,500.00
	2) Central Goods & Services Tax @ 9.00% on (1)				1,24,245.00
	3) State Goods & Services Tax @ 9.00% on (1)				1,24,245,00
	Gramd Total (1+2+3) (Sixteen Lakh Twenty Eignt Tholusand Nine Hundred Ninety Only)				16,28,990.00

३. शालार्थ संगणक प्रणालीचे कामकाज पाहण्यासाठी महाआयटी महामंडळाच्या ४ (चार) संगणक तंज्ञाच्या सेवा ५ महिन्यांसाठी घेण्याकरीता वरीलप्रमाणे एकूण रु.१६,२८,९९०/- (सोळा लाख अठ्ठावीस हजार नऊशे नव्वद फक्त) इतकी रक्कम महाआयटी महामंडळास अदा करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

४. यावरिल खर्च मागणी क्रमांक. ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण,८०-सर्वसाधारण शिक्षण,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२ H ४५४) ३१ सहायक अनुदाने या लेखाशिर्षातून सन २०१७-१८ च्या उपलब्ध तरतुदीमधुन भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी व शिक्षण संचालक, (माध्य.व उच्च माध्य.) यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०९१६३५२५७७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2017.11.09 16:24:38 +05'30'

(स्वाती नानल)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) अमुस, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्र.स., माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
३) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.,
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.
७) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्विय सहायक मंत्रालय.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९) निवडनस्ती- संगणक